**<u>ठळक बातम्या</u>**

- दिल्ली स्फोट प्रकरणी तपास यंत्रणांचे देशभरात छापे, मुंब्रा इथून एका संशयिताला अटक

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या बोत्सवाना दौऱ्यात दोन्ही देशांमधे आरोग्य सेवा आणि औषध निर्माण सहकार्यासाठी करार

- कालचक्र या जागतिक शांततेसाठी प्रार्थना करण्याच्या बौद्ध उत्सवाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भूतान नरेशांच्या हस्ते उद्घाटन

- शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव आणि अधिकृत निवडणूक चिन्हासंदर्भात आता येत्या २१ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**आणि**

- अंध महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा ऑस्ट्रेलियावर २०९ धावांनी विजय

**<><><><><>**

दिल्ली स्फोट प्रकरणाचा तपास वेगानं सुरू आहे. एनआयए, अर्थात राष्ट्रीय तपास संस्था आणि सुरक्षा यंत्रणांनी राष्ट्रीय राजधानी क्षेत्र तसंच जम्मू-काश्मीरमधल्या पुलवामा आणि कुलगामसह अनेक ठिकाणी मोठी कारवाई केली. या छाप्यात मोठ्या प्रमाणात स्फोटकं जप्त केली असून, श्रीनगरमधला डॉक्टर तजामुल मलिक याला ताब्यात घेतलं आहे. कुलगाममध्ये जमात-ए-इस्लामी या प्रतिबंधित संघटनेच्या ठिकाणांवर छापा टाकण्यात आला.

या स्फोटात वापरलेली कार गेल्या १० ते १२ दिवसांपासून फरिदाबादच्या अल-फलाह विद्यापीठाच्या पार्किंगमध्ये उभी असल्याचं चौकशीत समोर आलं आहे.

दरम्यान, या कार स्फोटाचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. ही कार अमित नावाच्या डीलरकडून खरेदी केली होती, त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

या प्रकरणातली संशयित डॉ शाहीन शाहीद हिचा भाऊ परवेझ अन्सारी याच्या लखनौमधल्या घरावर उत्तर प्रदेश एटीएसनं कारवाई केली असून तिथून मोबाईल फोन्स सह इतर यंत्रसामुग्री जप्त केली.

महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकानं मुंब्रा इथून एका संशयिताला अटक केली आहे. त्याच्या घरातून अनेक इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल उपकरणं जप्त केली असून त्यांचा तपास केला जात असल्याचं एटीएसनं सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि बोत्सवानाचे अध्यक्ष डुमा गिडॉन बोको यांच्यात आज द्विपक्षीय चर्चा झाली. यात दोन्ही नेत्यांनी अनेक प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर सहमती दर्शवली. आरोग्य सेवा आणि औषध निर्माण सहकार्यासाठी यावेळी करार करण्यात आला. बोत्सवानाला एआरव्ही औषधं देण्याची घोषणाही यावेळी राष्ट्रपतींनी केली. या करारामुळे आरोग्य सेवेतली समस्या दूर होऊन बोत्सवानाला परवडणाऱ्या औषधांचा पुरवठा सुलभ होईल, असं डुमा गिडॉन बोको म्हणाले.

यावेळी प्रोजेक्ट चित्ताची घोषणा करण्यात आली. या अंतर्गत बोत्सवाना भारताला आठ चित्ते भेट म्हणून देणार आहे.

शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि कौशल्य विकास या क्षेत्रांमधे सहकार्य करून भारतानं बोत्सवानाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका निभावली आहे,असं डुमो बोको म्हणाले. भारताची डिजिटल प्रगती बोत्सवानासाठी प्रेरणादायक आहे, असंही ते म्हणाले.

यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिथल्या संसदेला संबोधित केलं.

**<><><><><>**

भूतानचा दोन दिवसांचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परतले. प्रधानमंत्र्यांनी आज भूतान नरेश जिग्मे खेसार नामग्येल वांगचुक यांच्यासह आज थिंपू इथं कालचक्र उत्सवाचं उद्घाटन केलं. हा जागतिक शांततेसाठी प्रार्थना करण्याचा बौद्ध पारंपरिक उत्सव बौद्ध धर्मगुरु, 'जे खेनपो' यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. या दौऱ्यात मोदी यांनी वांगचुक यांच्याशी द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली.

भूतानच्या ऊर्जा प्रकल्पांसाठी सवलतीच्या दरान ४० अब्ज रुपये पतपुरवठा करण्याची घोषणा मोदी यांनी काल केली. नवीकरणीय ऊर्जा, आरोग्य अशा महत्त्वाच्या क्षेत्रात ३ सामंजस्य करारांवर प्रधानमंत्र्यांच्या या दौऱ्यात स्वाक्षऱ्या झाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज भूतानचे प्रधानमंत्री दाशो त्शेरिंग तोबगे यांच्याशीही चर्चा केली.

या दौऱ्यावरुन परतल्यानंतर, मोदी यांनी आज नवी दिल्लीतल्या लोकनायक जयप्रकाश नारायण रुग्णालयाला भेट दिली. लालकिल्ल्याजवळ झालेल्या स्फोटात जखमी झालेल्यांची त्यांनी विचारपूस केली. रुग्णालयातल्या अधिकारी आणि डॉक्टरांकडून त्यांनी उपचारांविषयी माहिती घेतली. या स्फोटामागे असलेल्यांना न्यायालयात उभं केलं जाईल, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशाचा किरकोळ महागाईचा दर यंदाच्या ऑक्टोबर महिन्यात कमी होऊन पाव टक्क्यावर आला. २०१५ सालापासूनचा हा ग्राहक भाव निर्देशांकावर आधारित सर्वात नीचांकी दर आहे.

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं जारी केलेल्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर महिन्यात महागाईचा दर कमी होऊन तो ग्रामीण भागात पाव टक्के, तर शहरी भागात ८८ शतांश टक्के इतका नोंदवला गेला.

अखिल भारतीय अन्न दर निर्देशांकावर आधारित अन्नधान्याचा महागाई दर, सलग पाचव्या महिन्यात कमी झाला, आणि ऑक्टोबर महिन्यात तो आणखी घसरून ५ टक्क्यावर आल्याचं यात  म्हटलं आहे.

<><><><><>

आज सार्वजनिक प्रसारण सेवा दिवस आहे. १९४७ मधे फाळणीनंतर भारतात आलेल्या विस्थापितांना याच दिवशी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी  ऑल इंडिया रेडियोवरुन संबोधित केलं होतं. या ऐतिहासिक भाषणाची आठवण म्हणून १२ नोव्हेंबर हा दिवस सार्वजनिक प्रसारण सेवा दिन म्हणून साजरा केला जातो. आज यानिमित्त नवी दिल्लीच्या आकाशवाणी केंद्रात बापू स्टुडियो इथं भक्तीगीत गायनाचा कार्यक्रम झाला. प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सैगल कार्यक्रमाला उपस्थित होते.

<><><><><>

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव आणि अधिकृत निवडणूक चिन्हासंदर्भात आता येत्या २१ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या संदर्भातली सुनावणी येत्या २ डिसेंबरला होणार होती. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर सुनावणी लवकर घेण्याची विनंती उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षांनी केली होती. त्यावर आज न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्यापीठासमोर सुनावणी झाली. पुढची सुनावणी २१ जानेवारीला होईल, असं न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

नवी दिल्लीत सुरू असलेल्या पहिल्या अंध महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारतानं ऑस्ट्रेलियाचा २०९ धावांनी पराभव केला. भारतानं नाणेफेक जिंकून, प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, आणि

निर्धारित २० षटकांत ४ गडी गमावून २९२ धावा केल्या. कर्णधार दीपिका हिने ९१, तर फुला सरेन हिने ५४ धावांची दमदार खेळी केली.

भारताच्या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ ८३ धावांतच गारद झाला. जमुना राणी हिनं चार, तर अनु कुमारी आणि काव्या व्ही. यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले.

<><><><>

ढाका इथं झालेल्या आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत कंपाउंड मिश्र प्रकारात भारताच्या अभिषेक वर्मा आणि दीपशिखा यांनी कझाकस्तानचा १५६-१५३ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. सुवर्ण पदकासाठी उद्या भारताचा सामना बांगलादेशाशी होईल. रिकर्व्ह प्रकाराच्या सांघिक स्पर्धेत अंशिका कुमारी आणि यशदीप भोगे परवा कोरियाविरुद्ध कांस्य पदकासाठी लढत देतील.

<><><><>

पोर्तुगालचा सुप्रसिद्ध फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो याने २०२६मध्ये होणाऱ्या फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेनंतर निवृत्त होणार असल्याचं जाहीर केलं आहे. आपली कारकिर्द आता अखेरच्या टप्प्यावर असून वयाची चाळीशी ही निवृत्त होण्याची योग्य वेळ असल्याचं त्याने सौदी अरेबिया इथे एका परिषदेत सांगितलं. येत्या फिफा विश्वचषकाच्या पात्रता फेरीचे सामने सुरू असून उद्या आयर्लंडविरुद्ध पोर्तुगाल हा सामना होणार आहे.

<><><><>

साहित्य अकादमी तर्फे देण्यात येणारे यंदाचे बाल साहित्य पुरस्कार येत्या १४ तारखेला नवी दिल्लीत प्रदान करण्यात येतील. मुलांसाठीच्या साहित्यासाठी देण्यात येणारे हे पुरस्कार यंदा साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते देण्यात येतील. ५० हजार रुपये आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप

आहे. मराठीत सुरेश सावंत यांच्या आभाळमाया या काव्यसंग्रहाला पुरस्कार मिळला आहे.

<><><><><>

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं नागरिकांसाठी हवामान बदल आणि मानवी कार्यक्रमा अंतर्गत अद्ययावत मार्गदर्शक तत्वं जारी केली आहेत. यानुसार सामुदायिक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयांमधे चेस्ट क्लिनीक उभारायला सांगितलं आहे. नागरिकानी अति प्रदूषण असलेले रस्ते, अति वर्दळीच्या ठिकाणी आणि उद्योग, बांधकामाच्या ठिकाणी जाऊ नये असं आवाहनही करण्यात आलं आहे.

घरामधे स्वयंपाकासाठी लाकूडफाट्याऐवजी गॅस किंवा इलेक्ट्रिसिटीचा वापर करावा, फटाके वाजवणं टाळावं, सिगारेट ओढू नये, डासांची अगरबत्ती लावू नये, सतत डोळे धुवावेत आणि कोमट पाण्यानं गुळण्या कराव्यात, असं आवाहन आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं केलं आहे.

<><><><><>

तामिळनाडू,आंध्र प्रदेशचा किनारी भाग,केरळ आणि माहे या भागात उद्या जोरदार पर्जन्यवृष्टी होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. येत्या १५ तारखेपर्यंत पूर्व मध्य प्रदेश आणि पूर्व राजस्थानात थंडीची लाट राहण्याची शक्यता विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//